नि.फौ.ख.क्र.१०३/२०१८.
सरकार वि. भोजराज व इतर
निशाणी क्र.१२०.

## आरोप निश्चीत करण्यापूर्वीचा पुरावा

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – प्रभाकर मारोतराव खोरघडे
**वय** – ५३ वर्षे **व्यवसाय** – सेवानिवृत्त वनपाल,
**राहणार** – झींगाबाई टाकळी, नागपूर , जिल्हा नागपूर.

**सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.एम. राउत यांच्या तर्फे**

**०१.** मागे बसलेले सर्व आरोपींना मी ओळखतो. सर्व आरोपींना मी गस्तीवर असतांना अवैध मासेमारी करताना पकडले होते. घटना हि दिनांक ०५.०५.२०१८ रोजी दुपारी ३.३० ते ४.०० वाजेच्या दरम्यान कक्ष क्रमांक ५३१ मध्ये घडली होती. त्यादिवशी मी दक्षिण सलामा उपवनक्षेत्रात क्षेत्रसाहाय्यक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मला वायरलेशन मॅसेज आला की, २०, २५, ३०–४० लोक तोतलाडोह येथे अवैधरित्या मासेमारी करीत आहेत. त्यांनतर मी पिंपरिया रेंज ऑफिस येथे वारलेशने सरकारी गाडी मिळावी म्हणून मॅसेज केला. त्यांनतर त्यांनी मला तत्काळ गाडी पुरविली. त्यानंतर माझ्याकउे असलेला स्टॉफ सलामा येथून घेवून तोतलाडोह मुख्यालय येथे गेलो. तेथून टॉर्च व दोन काडया घेवून व १०–१२ कर्मचारीसह कक्ष क्रमांक ५३१ मध्ये मॅगझीन नाला १, २ व ३ या ठिकाणी पोहचलो. त्यांनतर माझ्याकडे असलेला स्टॉफ तीन विभागात वाटला गेला. मी व एस.टी.पी.एफ.चा वनरक्षक आम्ही दोघे मॅगझींन नाला क्र.१ मध्ये गेलो. त्यानंतर माझ्या स्टॉफने आरोपींना अडवून त्यांनी अडविले आहे असा मला वायरलेशने मॅसेज केला. तेव्हा मी रस्त्यावर गेलो. सर्वांना अडवून मी सर्व हकिकत माझे वरिष्ठ देवकर साहेब यांना दिली. त्यांनतर मी सदर आरोपींना गाडीत बसवून पिंपरिया कार्यालयात आलो.

त्यानंतर सर्व कागदपत्रे तयार केले. जेव्हा त्यांना अडविले होते तेव्हा जागेवर मोका पंचनामा केला होता. आता मला मोका पंचनामा नि.२९ दाखविण्यात आला. त्यावर माझी, देवकरसाहेब, दोन पंचाच्या, आरोपींच्या व एस.टी.पी.एफ.चा कर्मचारी यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**०२.** आरोपींकडून जाळे, गंज, चाकू असे साहित्य मिळून आले होते. त्याचा जप्ती पंचनामा केला. आता मला दाखविण्यात आलेला जप्ती पंचनामा नि.२७ तोच आहे. त्यावर माझी, दोन पंच, देवकर साहेब व आरोपींच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर सदर मुद्देमाल हा सुपूरतनाम्यावर मला देण्यात आला. आता मला दाखविण्यात आलेला सुपूतनामा नि.२८ तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**०३.** आरोपींना घेवून मी पिंपरिया रेंज ऑफिस येथे आलो. त्यानंतर आरोपींना अटक करुन अटक पंचनामे तयार करण्यात आले. त्यानंतर मी वन अपराध पहिले प्रतिवृत्त दाखल केले. आता मला दाखविण्यात आलेले वन अपराध पहिले प्रतिवृत्त तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१२१** देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षीदार सुरेंद्र पाटील नि.१०२ यांचे बयान नोंदविले होते. त्यावर समक्ष म्हणून माझी सही आहे. तसेच त्यावर देवकरसाहेबाची व वनरक्षक सुरेंद्र पाटील याची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**०४.** त्यानंतर मी भुषन राउत नि.१०३ यांचे बयान मी नोंदविले होते. त्यावर समक्ष म्हणून माझी सही आहे. तसेच त्यावर देवकरसाहेबाची व भुषन राउत याची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर मी गजानन परतेती नि.१०४ यांचे बयान मी नोंदविले होते. त्यावर समक्ष म्हणून माझी सही आहे. तसेच त्यावर देवकरसाहेबाची व गजानन परतेती याची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर मी विवेकानंद जायभाये वनरक्षक नि.१०५ यांचे बयान मी नोंदविले होते. त्यावर समक्ष म्हणून माझी सही आहे. तसेच त्यावर देवकरसाहेबाची व विवेकानंद जायभाये याची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. अजून दोन–तीन साक्षीदारांचे बयान मी नोंदविले होते. आता साक्षीदाराला नि.१०६ वरील पंकज लांबसे याचे बयान दाखविण्यात आले. त्याचे बयान माझ्या समक्ष नोंदविण्यात आले होते. त्यावर माझी, देवकरसाहेब व

साक्षदार यांच्या सहया आहेत. साक्षीदाराला नि.१०७ वरील साक्षदार महेश शंकर ठनके यांचे बयान दाखविण्यात आले. त्याचे बयान माझ्या समक्ष नोंदविण्यात आले होते. त्यावर माझी, देवकरसाहेब व साक्षदार यांच्या सहया आहेत. साक्षीदाराला नि.१०८ वरील साक्षदार बंडू माणिक उमरे यांचे बयान दाखविण्यात आले. त्याचे बयान माझ्या समक्ष नोंदविण्यात आले होते. त्यावर माझी, देवकरसाहेब व साक्षदार यांच्या सहया आहेत. साक्षीदाराला नि.१०९ वरील साक्षदार बंडू उईके यांचे बयान दाखविण्यात आले. त्याचे बयान माझ्या समक्ष नोंदविण्यात आले होते. त्यावर माझी, देवकरसाहेब व साक्षदार यांच्या सहया आहेत. साक्षीदारांने सांगितल्याप्रमाणे त्यांचे बयान माझ्या समक्ष नोंदविण्यात आले होते. त्यांच्या बयानातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**०५.** त्यानंतर आरोपींना न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले. त्यानंतर देवकर साहेबांनी गुन्हयाचा तपास केला होता.

**उलट तपासणी आरोपीचे वकिल श्री गजभिये यांनी सांगितल्यावरुन साक्षीदाराचा उलट तपास राखून ठेवला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

रामटेक
दिनांक – २८/०९/२०२२

**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
रामटेक

नि.फौ.ख.क्र.१०३/२०१८.
सरकार वि. भोजराज व इतर
**निशाणी क्र.१२० वर पुढे**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक २ प्रभाकर मारोतराव खोरघडे यांचा उलट तपास आरोपी क्रमांक १,४,५,७ ते ९, ११, १३ ते १५, १७ ते १९ व २१ ते २३ याचें तर्फे वकील श्री. ए. व्ही. गजभीये यांच्या मार्फेत शपथेवर पुढे सुरु</u>**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, तोतलाडोह धरणात गस्ती करीता शासनामार्फेत वन विभागाला मोटर बोट देण्यात आलेल्या आहेत कारण डॅमचा आजुबाजुचा परीसर हा घनदाट जंगल असुन तेथे हिंसक प्राणी असतात. हे म्हणणे खरे आहे की, तोतलाडोह धरणा पासुन आरोपींची गावे अंदाजे २५ ते ३० कि.मी. अंतरावर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या गावाकडून तोतलाडोह धरणाकडे जाना-या रस्त्यावर वन विभागाच्या चौक्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तसेच प्रत्येक बीटामध्ये वन विभागाच्या कुटया देखील बनवण्यात आल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालया मार्फेत गस्ती करीता जातो त्याबाबत कार्यालयात रेकॉर्ड ठेवला जातो. हे म्हणणे खरे आहे की, वन गुन्हयामध्ये जे काही मालमत्ता जप्त होते त्यावर निशान लावले जाते. हे म्हणणे खरे आहे की, तसेच जप्तीचा माल ठेवण्या करीता आमच्या कार्यालयात मालखाना असुन तेथे नोंदी देखील घेतल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही राउंड ऑफीसर पी.ओ.आर. बनवीतात त्याची एक प्रत आरएफओ व डीएफओ कार्यालयात पाठविली जाते. हे म्हणणे खरे आहे की, दक्षीण सलामा व उत्तर सलामा वेगळेवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी दक्षीण सलामा येथे राउंड ऑफीसर म्हणून नौकरीस होतो.

**०७.** आता साक्षीदाराला नि.२९ वरील पंचनामा दाखवीण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, उ सलामा कापुन द सलामा असे लिहीण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनाम्यावर खाडा-खोड केल्यानंतर त्याच्या बाजुला सक्षम अधिकारी याची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, पीओआर मध्ये उत्तर सलामा असे नमुद आहे साक्षीदार सांगतो की, घटना उत्तर सलामाची असल्याने त्यात उत्तर सलामा असे नमुद आहे. हे

म्हणणे खरे नाही की, उत्तर सलामा मध्ये कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दक्षीण सलामा मध्ये देखील कोणतीही घटना घडली नव्हती. उत्तर सलाम्याचे राउंड ऑफीसर केकान हे होते. देवकर साहेब हे दवाखाण्यात मुलीला घेवुन गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिं.०५.०५.२०१८ रोजी देवकर साहेब हे त्यांच्या मुलीला घेवुन नागपूर येथे दवाखाण्यात गेले होते. त्या वेळेस दुसरे कोणतेही आरएफओ यांच्याकउे देवकर साहेबांचा चार्ज नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, देवकर साहेबांना सर्व कागदवत्र मी दुस-या दिवशी सकाळी दिले होते.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, सदर गुन्हयाचा तपास मी ०६.०५.२०१८ रोजीचे सकाळी ०७.०० ते दुपारी ०२.०० वा. पर्यंत मी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळेस मी तपास केला त्या वेळेस मी आरोपींचे अटक पंचनामे वैगेरे बनवीले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.२७ वर जप्ती मालावर कोणतेही निशान लावल्याचे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.१२१ वर दाखल केव्हा झाला व आरएफओ व डीएफओ कार्यालयात केंव्हा पाठविला गेला याबाबत काही नमुद नाही.

**०९.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, सदर दिवशी मी गस्तीवर असतांना आरोपींना अवैध मासेमारी करतांना पकडले होते व मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, घटना दिनांक ०५.०५.२०१८ रोजी ०३.३० ते ०४.०० दरम्यान कक्ष क्रमांक ५३१ मध्ये घडली होती व त्या दिवशी वायरलेस मॅसेज आला की २५-३०-४० लोक तोतलाडोह येथे अवैध रीत्या मासेमारी करीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, मी पींपरीया रेंज् ऑफीस येथे वायरलेस व्दारे गाडी बोलवण्या करीता मॅसेज केला व त्यांनी मला गाडी तत्काल पुरवीली. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, माझे स्टाफला घेवुन सलामा येथे मुख्यालयात येथे गेलो तेथुन टॉर्च व काडया घेवुन १०-१२ कर्मचा-यांसह कक्ष क्रमांक ५३१ येथे पोहोचलो व मी व माझा स्टाफ असे आंम्ही तीन भागात वाटले गेलो तसेच मी व एक वनरक्षक आंम्ही दोघे मॅग्झीन नाला क्रमांक १ येथे गेलो. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, माझ्या स्टाफ ने आरोपींना अडवीले असल्या बबात

मला मॅसेज केला त्यानंतर मी रस्त्यावर गेलो सर्वांना अडवुन सर्व हकीकत माझे वरीष्ठ देवकर यांना दिली व त्यानंतर आरोपींना गाडीत बसवुन पींपरीया कार्यालयात आणले. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, घटनास्थळी मौका पंचनामा नि.२९ केला व तयावर आरोपी, साक्षदार व देवकर साहेबांनी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, घटनास्थळी जप्ती पंचनामा केला होता व तेथे आरोपी कडून जाडे गंज व चाकु जप्त करण्यात आले होते व आरोपींनी जप्ती पंचनामा नि.२७ वर सही केली होती.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, मला साक्षीदारांसमक्ष सुप्रुतनाम्यावर मुददेमाल दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, आरोपींना आंम्ही पींपरीया रेंज येथे कार्यालयात घ्रुवन आलो व तेथे अटक पंचनामे केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतल्या प्रमाणे कोणतीही घटना घडली नवहती व आमचे काम चांगले दाखवण्या करीता खोटे पी.ओ.आर आरोपींविरुध बनवीले व खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, साक्षीदार सुरेंद्र पाटील, बिसन राउत, गजानन परतेती, विवेकानंद जायभाये, पंकज लामसे यांचे बयान त्यांच्या सांगण्या प्रमाणे नोंदवीले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, महेश ठणके व बंडू कुमरे व बंडू उईके यांचे बयान देवकर साहेबांनी माझ्या समक्ष नोंदवीले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, देवकर साहेबांनी गुन्हयाचा तपास केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आंम्ही वन अधिकरी असे सर्व मिळुन पहाटे आरोपींच्या घरी गेले व तुम्हाला वन अधिकारी यांनी चर्चा करण्या करीता बोलवीले आहे असे सांगुन दिनांक ०६.०५.२०१८ रोजी सकाळी आंमही त्यांना कार्यालयात घेवुन आलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना कार्यालयात खोटया कागदपत्रावर सहया घेतल्या व त्यांच्या विरुध्द खोटी कार्यवाही केली. हे म्हणणे खरे नाही की, दिं.०५.०५.२०१८ रोजी कोणतीही घटना घडली नवहती व कोणताही पीओआर पाडला नव्हता म्हणून त्याबाबत त्याची सुचना आरआफओ किंवा डीएफओ कार्यालयात दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वन विभागात कार्यारत असल्याने आमचे चांगले काम दाखवण्या करीता खोटी केस केली व खोटी साक्ष देत आहे.

**इतर आरोपींकरीता वकील श्री.ए.जी. कारेमोरे यांनी वरील उलट तपास ग्राहय धरण्या करीता विनंती केली ती मंजुर करण्यात आली.**
**इतर आरोपीं करीता वरील उलट तपास ग्राहय धरण्यात येत आहे.**

**उलट तपास पुर्ण**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/–

रामटेक **(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**
दिनांक – २३/०२/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
रामटेक